# प्रेसनोट

पुणे पोलीस १०० नंबर कार्यप्रणालीवर येणा-या भरमसाठ व अनावश्यक कॉल्सला आळा घालण्यासाठी व प्रत्यक्ष ज्या नागरिकांना मदतीची गरज आहे, त्यांच्यासाठी नव्यानेच **I.V.R.S.** म्हणजे **(Inter active voice responce system)** ही कार्यप्रणाली १०० नंबरवर बसविण्यात आलेली आहे. त्यानुसार जेव्हा नागरिक १०० नंबर वर फ़ोन करतील तेव्हा त्यांना प्रथम "जयहिंद पुणे पोलीस कृपया आपल्या मदतीसाठी एक दाबा" असे हिन्दी, इंग्रजी व मराठीतुन ऐकविले जाते व त्याप्रमाणे नागरिकांनी कार्यवाही केल्यावर त्यांचा कॉल १०० नंबरला जोडला जावुन त्यांना तात्काळ मदत पुरविली जाते. तसेच त्यांना योग्य मदत मिळाली व त्यांचे समाधान झाले किंवा नाही याचा पाठपुरावा सुध्दा नियंत्रण कक्ष अधिकारी यांचेकडुन घेतला जात आहे.

या नव्यानेच सुरु झालेल्या १०० नंबर डायल कार्यप्रणालीला **I.V.R.S. (Inter active voice responce system)** ही सिस्टीम लावल्यापासुन नियंत्रण कक्ष, पुणे शहर येथे येणा-या कॉलची संख्या २५ ते ३० हजाराहुन एकदम १००० ते १५०० एवढी आलेली आहे. त्यामुळे ज्यांना पोलीसांची प्रत्यक्ष मदतीची गरज आहे त्यांचे फ़ोन तात्काळ लागले जात आहेत. व त्यांना योग्य वेळेत मदत मिळुन त्यांच्या तक्रारींचे निरसन होत आहे. त्यामुळे ब-याचशा नागरिकांनी या प्रणालीचे कौतुक केलेले आहे व ही कार्यप्रणाली अत्यंत उपयुक्त असल्यांचे फ़ोनद्वारे कळविले आहे.

तसेच जे नागरिक नियंत्रण कक्ष येथे रात्री अपरात्री फ़ोन करुन नियंत्रण कक्ष येथे नेमणुकीस असलेल्या महिला कर्मचा-यांशी असभ्य व अश्लील भाषेत संभाषण करीत असत त्यांच्यावर बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे ४ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तर जे नागरिक अथवा त्यांची लहान मुले विनाकारण १०० नंबर वर फ़ोन करुन मिस कॉल देत होते, त्यांनाही त्यांच्या फ़ोनवर फ़ोन करुन समज दिलेली आहे.

या **I.V.R.S. (Inter active voice responce system)** कार्यप्रणालीमुळे नियंत्रण कक्ष येथे काम करणा-या कर्मचा-यांचा ताण कमी झालेला असुन, त्यांनी याबाबत समाधान व्यक्त केलेले आहे.

ही कार्यप्रणाली यशस्वीपणे राबविण्यासाठी मा.शेषराव सुर्यवंशी, पोलीस उपायुक्त, मुख्यालय,पुणे शहर व दीपक हुंबरे सहाय्यक पोलीस आयुक्त, अभियान आणि परसीस्टंट कंपनीचे श्री वैभव गिव्हरे, वरिष्ठ व्यवस्थापन व त्यांचे सहकारी सारंग पंडीत, दीपक सापटे, तंत्र सहाय्यक व नियंत्रण कक्षातील महिला कर्मचारी आश्लेषा माने, माधुरी अनभुले व स्नेहल केकडे यांनी परिश्रम घेतलेले आहेत.

सदरची प्रेसनोट वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यासाठी मान्यता मिळणेस विनंती आहे.